# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/12/2022 (बुधवार) सकाळ

## घरफोडी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावर प्रगती नगर सुपर टाउन कन्हान येथे दिनांक २०/१२/२०२२ चे १२.०० वा. ते १३.२० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सोनु आनंदराव सहारे, वय ३१ वर्ष, रा. प्रगती नगर गहुहिवरा रोड सुपर टाउन कन्हान हे आपल्या आईवडीलांसह काचुरवाही येथील वहिणी मरण पावल्यामुळे सर्वजण घराला कुलुप लाऊन कन्हान वरुन काचुरवाही रामटेक येथे अंत्यविधी करीता गेले असता मयतीला काचुरवाही येथे पोहचले असता अंदाजे दुपारी ०१.२० वा. दरम्यान फिर्यादीला त्यांच्या घराशेजारी राहणाऱ्या काकु नामे– सुनिता राजकुमार मेश्राम यांनी फोन करुन सांगितले की तुझ्या घराचा दरवाजा उघडा आहे व दरवाज्याचा लॉक तोडलेला आहे त्यामुळे फिर्यादी व फिर्यादीचे काका नामे– राजकुमार मेश्राम यांनी परत काचुरवाही येथुन फिर्यादीच्या राहत्या घरी येवुन पाहिले असता फिर्यादीच्या घराचा दरवाजा उघडा दिसला व दरवाज्याला लावलेला लॉक बाजूला पडलेला दिसला. आत जाऊन पाहिले असता घरातील सामान अस्तव्यस्त पडल्याचे दिसुन आले. बेडरुम मधील लोखंडी आलमारीचा दरवाजा वाकवलेला होता व आलमारीत ठेवलेले १) सोन्याचे पदक ५ ग्रॅम २) सोन्याचे पदक ३ ग्रॅम ३) सोन्याचे मनी १० ग्रॅम ४) सोन्याच्या लहान काठी ५ ग्रॅम ५) लहान काठीचे मनी २.५ ग्रॅम असा एकुण २५.५ ग्रॅम सोन्याचे दागीने जुने वापरते किंमती अंदाजे ६३५००/– व नगदी ५०००/– रु. असा एकुण ६८५००/–रू. किंमतीचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने घरातील आत प्रवेश करून आलमारीतील मुद्देमाल चोरी करून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार खुशाल रामटेके ब. नं. २९८ मो. नं. ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. बेला** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा बेलपेठ शिवार येथे दिनांक २०/१२/२०२२ चे १०.३० वा. ते ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– उत्तम झामाजी भुडे, ५० वर्षे, रा. बेलपेठ ता. उमरेड जि. नागपुर हे आपले शेतात पाणी ओलत असताना यातील आरोपी नामे– पुरूषोत्तम झामाजी भुडे, वय ४७ वर्षे, रा. बेलपेठ ता. उमरेड जि. नागपुर याने फिर्यादीला शिवीगाळ करून शेतात पाणी का ओलते असे म्हणुन खाली पाडुन काठीने डोक्यावर मारून तसेच हातापायावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रंगारी ब नं ७३५ मो. क्र. ८९७५६०४२८८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**